# गुलाबाची लागवड व संगोपन

**मशागत:**

२.५ x २.५ x २.५आकाराचा खड्डा तयार करा. त्यामध्ये ५०% चांगली कसदार माती, ५०% कुजलेले शेणखत घाला. त्यात २०० ग्रॅम निम-केक, ५० ग्रॅम रॅलीमिल / स्टेरमिल व मूठभर १०% लिंडेन पावडर चांगली मिसळून घ्यावी. रोप लावण्यापूर्वी पाणी घातलेले असावे. वापसा आल्यावर झाडे लावावयाची झाल्यास आकार कमीत कमी १२" असावा. त्यामध्ये १०० ग्रॅम निमकेक अथवा ५० ग्रॅम स्टेरामिल अथवा एक चमचा लिंडेन पावडर घालावी.

**खते:**

लागवडीनंतर एक महिन्याने झाडास १ चमचा स्टेरामिल, रॅलिमिल अथवा १०० ग्रॅम निमकेक घालावे व नंतर दर १५ दिवसांनी १ लहान चमचा रोजमिक्स लहान झाडास, तर मोठा चमचा मोठ्या झाडास घालावे. उन्हाळ्यात झाडांना रोजमिक्स देऊ नये.

**फवारणी:**

दर ८ ते१० दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. औषध पाण्यामध्ये नीट मिसळवून घ्यावे. फवारणी झाल्यानंतर पंप नीट धुवून व तेलपाणी करून ठेवावा. १) रोगोर किंवा डिमेक्रॉन २ भाग, ब्लायटॉक्स १ भाग, डायथेन एम-४५ (तुडतुडे आणि इतर किडीसाठी व पावसाळ्यात येणाऱ्या काळ्या ठिपक्यांसाठी) २) मॅलेथिऑन किंवा नुव्हॉन गंधक (पाने खाणाऱ्या कीटक व अळ्यांसाठी आणि थंडीत होणाऱ्या पावडर मेल्डू रोगासाठी) जास्त कीड होत असल्यास ४/५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी)

**सूचना - झाडाच्या नावाचे तारेचे लेबल सैल व वरच्या फांदीवर लावावे. पॉलिथिन बॅगांमध्ये झाडे पिशव्या वरीलप्रमाणे लावावीत.**

**छाटणी:**

**हलकी छाटणी -** पावसाळ्याच्या सुरुवातीला हलकी छाटणी करावी. जीर्ण फांद्या व शेंडे हलकेच कापावेत.

**खरडून छाटणी -** हिवाळ्याच्या दिवसांत प्रथम छाटणीनंतर येऊन गेलेल्या फुलोऱ्यानंतर झाडांच्या खोडापासून ६ ते ९ इंच उंचीच्या जाड फांद्या राखून खरडून छाटणी करावी. सर्व बारीक फांद्या छाटून टाकाव्यात. जेणेकरून उन्हाळ्याच्या अखेरपर्यंत फुले मिळतील. कापणीनंतर आवश्यक खत, पाणी व औषधे द्यावीत.

**फुले काढणी:**

फूल काढतांना देठाखालील दोन पाने ठेऊन दांडी ठेऊन कापावीत म्हणजे खालच्या जोरकस डोळ्यातून पुढील कळीची निर्मिती होईल.

